सं.फौ.ख.क्र. ७४/२०२६

**निशाणी क्र.**

## न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग मुरुड, जिल्हा रायगड यांचे न्यायालयात

| | | |
|---|---|---|
| १. घटना दिनांक | – | २६–०२–२०२६ |
| २. तक्रार दिनांक | – | २६–०२–२०२६ |
| ३. तक्रारदाराचे नाव, वय व पत्ता | – | सरकारतर्फे<br>मुरुड पोलीस ठाणे,<br>ता. मुरुड, जि. रायगड. |
| ४. आरोपीची नावे, वय व पत्ता | – | **संजय दत्तात्रेय पडवळ**,<br>वय – ५२ वर्षे, धंदा – चालक,<br>रा. दत्तमंदीर रोड, मुरुड, ता. मुरुड,<br>जि. रायगड |
| ५. तक्रारपात्र गुन्हयाचे विवरण | – | |

दिनांक २६–०२–२०२६ रोजी १९.१९ वाजताच्या सुमारास मौजे बाजारपेठ, येथील पुरकर नाका समोरील डांबरी सार्वजनिक रस्त्यावर, ता. मुरुड, जि. रायगड येथे तुम्ही तुमच्या ताब्यातील रिक्षा क्र. एम. एच. ०६ झेड. ४०८० हि रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन रहदारीस व येणारे–जाणारे वाहनास अडथळा व धोका निर्माण होईल अशा स्थितीत उभी केली आणि त्याअन्वये तुम्ही भारतीय न्याय संहिता कलम २८५ नुसार शिक्षेस पात्र गुन्हा केला व मी त्याची दखल घेतली आहे.

स्वाक्षरी/–

(घनःशाम रा. तिवारी)

दिनांकः १४.०३.२०२६ — न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मुरुड

प्र. १. तुम्हाला पोलीस तपासाच्या कागदपत्रांच्या नकला मिळाल्या काय?

उत्तर होय.

प्र. २. तुमचेवर ठेवणेत आलेला दोषारोप तुम्हाला समजला काय?

उत्तर होय.

प्र. ३. तुम्हाला गुन्हा कबुल आहे का?

उत्तर होय. मला गुन्हा कबुल आहे.

"समक्ष"

स्वाक्षरी/–

आरोपीची सही / अंगठा — (घनःशाम रा. तिवारी)

दिनांकः १४.०३.२०२६ — न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मुरुड

सं.फौ.ख.क्र. ७४/२०२६
**निशाणी क्र.**

## न्या य नि र्ण य

( दिनांक १४ मार्च, २०२६ रोजी घोषीत.)

आरोपीवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८५ नुसार दोषारोप ठेवण्यात आला आहे. आरोपी याने त्याच्या विरुध्दचा दोषारोप कबुल केला आहे. सदर अपराधासाठी कमाल रुपये ५,०००/– पर्यंत द्रव्य दंडाची तरतूद आहे. आरोपीने पुरसीस सादर करुन त्याची परिस्थिती गरीबीची असल्याने कमीत कमी दंड करावा, अशी विनंती केली आहे. सदरचे प्रकरण मामुली अपराधाच्या स्वरुपातील असून आरोपी हजर होवून द्रव्य दंड भरण्यास तयार आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

१. आरोपी **संजय दत्तात्रेय पडवळ** यांस भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५ नुसार भारतीय न्याय संहिता कलम २८५ या अपराधामध्ये दोषी धरुन रुपये ५००/– दंडाची शिक्षा देण्यात येते.

२. आरोपीने द्रव्यदंड भरला नाहीतर त्यास १ दिवसाच्या साध्या कारावासाची शिक्षा देण्यात येते.

३. सदर प्रकरण निकाली काढण्यात आले.

स्वाक्षरी/–
(घनःशाम रा. तिवारी)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मुरुड

दिनांकः १४.०३.२०२६